## ७. लोकप्रशासन

**प्र.१ अ ) दिलेल्या प्रतयांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा:**
1) प्रशासकीय व्येवस्थेचा **<u>मानवी संसाधन</u>** हा काना असतो. .
२) POSDCORB हा संक्षेप ग्युलिक आणि **<u>उर्विक</u>** यांनी मांडला.

**ब ) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा :**
१) कौटिल्य – चाणक्य
2) अॅरिस्टॉटल – द पॉलिटिक्स
3) मॅकियावेली – रिपब्लिक
**उत्तर : दुरुस्त जोडी :**
**मॅकियावेली – 'द – प्रिन्स '**

**क) दिलेल्या विधांनांसाठी समर्पक संकल्पना लिहा :**
१) १८व्या शतकातील प्रशिया व ऑस्ट्रिया येथील शासकीय व्यवहारांच्या पद्धतशीर व्यवस्थापनाची प्रणकली .
**उत्तर : कॅमेरॅलिझम**

२) कंपन्यांनी सामाजिक व पर्यावरणविषयक जाणिवा समजावून घेण्याचा केलेला प्रयत्न .
**उत्तर : उद्योगांचे सामाजिक उत्तरदाइत्व**

**प्र.२ पुढील विधाने चूक किंवा बरोबर ते सकारण स्पष्ट लिहा :**
**(प्रत्येकी २ गुण)**
**(१) प्रशासनातील पहिला टप्पा हा कर्मचारी भरतीचा असतो.**
**उत्तर :** हे विधान **चूक** आहे.
**कारण :** प्रशासनाचा पहिला टप्पा नियोजन हा असतो.
**(२) लोकप्रशासन या विद्याशाखेचा जन्म भारतात झाला.**
**उत्तर :** हे विधान **चूक** आहे.
**कारण :** लोक प्रशासन या विद्याशाखेचा जन्म अमेरिकेत झाला.

**प्र. ३ सहसंबंध स्पष्ट करा :**
**(प्रत्येकी ४ गुण)**
**(१) खाजगी प्रशासन व लोकप्रशासन.**
**उत्तर :** लोकप्रशासनाची व्याप्ती व्यापक असली तरी सर्व कार्ये ते पार पाडू शकत नाही. उदयोगधंदे, बँकिंग, आयात-निर्यात, शिक्षण, आरोग्य सेवा इत्यादी उपक्रमांत खाजगी व्यक्ती व संस्था यांना सहभागी करून घेतले जाते. याचाच अर्थ प्रशासकीय नोकरवर्गाद्वारे केल्या जाणाऱ्या उपक्रमांचा समावेश लोकप्रशासनात, तर उद्योग संस्था, शैक्षणिक संस्था, वैदयकीय संस्थांद्वारा हाती घेतल्या जाणाऱ्या कार्याला खाजगी प्रशासन असे म्हणतात. लोकप्रशासन लोककल्याणासाठी कार्य करते, तर खाजगी प्रशासन नफाप्राप्तीसाठी कार्य करते.

**(२) ग्रामीण प्रशासन व शहरी प्रशासन**
**उत्तर :** स्थानिक स्तरावरील प्रशासनाची ग्रामीण प्रशासन आणि शहरी प्रशासन अशी विभागणी करण्यात येते. देशाच्या ग्रामीण भागात पंचायती राज ही व्यवस्था प्रशासनाची जबाबदारी पार पाडते. पंचायती राज ही त्रिस्तरीय यंत्रणा जिल्हा, तालुका आणि गाव पातळ्यांवर कार्य करते. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषदेचा, गट विकास अधिकारी पंचायत समितीचा आणि ग्रामसेवक ग्रामपंचायतीचा प्रशासकीय प्रमुख असतो. शहरी भागाची लोकसंख्येच्या आधारे महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायती आणि छावणी क्षेत्रात कटक मंडळे असतात. महानगरपालिका आयुक्त हा महानगरपालिकेच्या प्रशासनाचा प्रमुख अधिकारी असतो. नगरपालिका, नगरपरिषद व कटक मंडळांची प्रशासकीय प्रमुखास कार्यकारी अधिकारी असे म्हणतात.

**प्र. ४ खलील प्रश्नांची उत्तरे लिहा .**
**(२) प्रशासनाचे कार्य कसे चालते ते स्पष्ट करा.**
**उत्तर :** (१) संघराज्यात्मक शासनप्रणाली असलेल्या भारतात केंद्र सरकार व राज्य सरकारे या दोन स्तरांवर प्रशासकीय यंत्रणा कार्य करीत असते. प्रत्येक राज्यांतर्गत ग्रामीण आणि शहरी भागात स्थानिक स्तरीय प्रशासन पार पाडले जाते.
(२) केंद्र सरकारच्या अखत्यारीतील विषयांची जबाबदारी पार पाडण्यासाठी विविध मंत्रालये (Ministries) आणि त्या अंतर्गत खाती (Departments) व विभाग (Divisions) स्थापन करण्यात येतात.. परराष्ट्र व्यवहार, गृह, संरक्षण, वित्त मंत्रालय त्यातील काही महत्त्वाची मंत्रालय आहेत. प्रत्येक मंत्रालयाचा राजकीय प्रमुख संबंधित खात्याचा मंत्री असतो. त्यास साहाय्य करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा असते.
(३) केंद्र स्तरावर लोकसेवा आयोग, निर्वाचन आयोग, नीती आयोग या सारख्या स्वायत्त यंत्रणा आहेत. त्या प्रत्येकाची स्वतःची प्रशासकीय यंत्रणा असते.
(४) केंद्र सरकारप्रमाणेच ज्या विषयांची जबाबदारी राज्यांकडे सोपवण्यात आली आहेत, त्यांची मंत्रालय, खाती व विभाग असतात. केंद्राप्रमाणे राज्यातही संबंधित मंत्रालयाचा राजकीय प्रमुख मंत्री असतो आणि त्यास साहाय्य करणारी प्रशासकीय यंत्रणा असते.
(५) प्रत्येक राज्यात स्थानिक स्तरावर ग्रामीण आणि नागरी प्रशासन कार्य करते. जिल्हाधिकारी जिल्ह्याचा प्रशासकीय प्रमुख, तर तहसीलदार तालुका प्रशासनाचा प्रमुख अधिकारी असतो. महापालिका आयुक्त महानगरपालिकेचा प्रशासकीय प्रमुख असतो. नगर परिषद व नगर पंचायतीच्या प्रशासनाची जबाबदारी त्यांच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांकडे सोपवली जाते.
(६) स्थानिक प्रशासनात लोकप्रतिनिधींचा सहभाग असतो. ग्रामीण भागात जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायती या प्रातिनिधिक संस्था कार्यरत आहेत. शहरी भागात महानगरपालिका, नगरपालिका, नगर परिषद आणि कटक मंडळ या प्रातिनिधिक संस्था कार्यरत आहेत.

**(३) सार्वजनिक धोरण निर्मितीचे टप्पे स्पष्ट करा.**
**उत्तर :** (१) २०व्या शतकाच्या उत्तरार्धात शासन आणि प्रशासन अधिक गुंतागुंतीचे झाले आहे. वाढता परस्पर संपर्क, माहिती तंत्रज्ञानातील प्रगती, जागतिकीकरण इत्यादींचा प्रभाव लोकप्रशासनाच्या अभ्यासावरही झाला आहे. शासनाने लोककल्याणाच्या धोरणावर लक्ष्य केंद्रित करावे हा विचार प्रभावीपणे मांडला जात आहे. या नवीन दृष्टिकोनाला सार्वजनिक धोरण असे म्हणतात.

**(२) सार्वजनिक धोरण ही तीन टप्प्यांतून घडणारी प्रक्रिया आहे. ते तीन टप्पे पुढीलप्रमाणे :**
**(i) धोरणाची निवड :** भारतासारख्या विकसनशील देशांत असंख्य समस्या असतात आणि त्या

सोडवण्याची साधने मर्यादित असतात. म्हणून कोणती समस्या अधिक महत्त्वाची आहे हे निश्चित करणे, म्हणजेच समस्यांचा प्राधान्यक्रम ठरवणे गरजेचे असते. त्यानंतर ती समस्या सोडवण्यासाठी उपलब्ध असलेल्या विविध पर्यायांची साधक बाधक चर्चा राज्यकर्ते व त्यांचे सल्लागार - वरिष्ठ सनदी अधिकारी करतात. त्यानंतर समस्या सोडवण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना निश्चित करणारे धोरण निवडले जाते.
**(i) धोरणाची कार्यवाही :** पूर्ण तयारी झाल्यानंतर प्रशासनाद्वारा शासकीय धोरणाची कार्यवाही करण्यात येते. त्यातून धोरणाच्या कार्यवाहीत उद्भवणाऱ्या समस्या स्पष्ट होतात आणि आवश्यक ते बदल करण्यात येतात.
**(iii) धोरणाचा परिणाम :** धोरणाचा परिणाम समजण्यासाठी धोरणाचे व त्याच्या कार्यवाहीचे मूल्यमापन करण्यात येते. उदा., भारत सरकारने सामूहिक विकास कार्यक्रमाचे मूल्यमापन करण्यासाठी १९५७ साली बलवंतराय मेहता यांच्या नेतृत्वाखाली एका अभ्यासगटाची नेमणूक केली होती. या अभ्यास गटाने सामूहिक विकास कार्यक्रमाचे
अपयश स्पष्ट करताना, त्यात आवश्यक त्या सुधारणा सुचवल्या होत्या. भारत सरकारने लोकशाही विकेंद्रीकरणाची शिफारस स्वीकारून, सामूहिक विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची जबाबदारी पंचायती राज संस्थांकडे सोपवण्याचा निर्णय घेतला होता.

**प्र. ५ दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे पुढील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा :**
**लोकप्रशासनाची व्याख्या लिहून, त्याची पुढील मुद्दयांच्या आधारे व्याप्ती स्पष्ट करा :**
**[मुद्दे : (१) संक्षिप्त दृष्टिकोन (२) व्यापक दृष्टिकोन ]**
**उत्तर : (१) संक्षिप्त दृष्टिकोन**
**(अ) लोकप्रशासनाची व्याख्या :** शासकीय धोरणांची कार्यवाही आणि त्यांतील उद्दिष्टे साध्य करण्यासाठीचे मानवी संघटन व व्यवस्थापन म्हणजे लोकप्रशासन. म्हणून लोकप्रशासनाला कृतिशील शासन (Government in Action) असे म्हणतात. लोकप्रशासनाच्या अभ्यासकांनी लोकप्रशासनाच्या दिलेल्या काही व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत :
(१) वुड्रो विल्सन यांच्या मते, "कायदयाची सविस्तर आणि व्यवस्थित अंमलबजावणी करणे म्हणजे लोकप्रशासन होय."
(२) एल. डी. व्हाईट यांच्या मते, "सार्वजनिक धोरणाच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी ज्या यंत्रणेचा वापर करण्यात येतो, त्यास लोकप्रशासन असे म्हणतात.
(३) हर्बर्ट सायमन यांच्या मते, "राष्ट्र, राज्य आणि स्थानिक शासन या संस्थांच्या प्रशासकीय विभागाच्या कार्याला लोकप्रशासन असे म्हणतात.
(४) ड्वाईट वॉल्डो यांच्या मते, "राज्याच्या कार्यासाठी व्यवस्थापनाच्या ज्या कला व शास्त्र यांचा उपयोग करण्यात येतो,त्यास लोकप्रशासन असे म्हणतात."
**(ब) लोकप्रशासनाची व्याप्ती :** लोकप्रशासनाच्या व्याप्ती संबंधीचे दोन दृष्टिकोन पुढीलप्रमाणे आहेत:
**संक्षिप्त दृष्टिकोन :** ग्युलिक आणि उर्विक या विचारवंतांच्या POSDCORB या संक्षेपात लोकप्रशासनाची व्याप्ती पुढीलप्रमाणे
विशद करण्यात आली आहे :
**(१) P - Planning (नियोजन) :** नियोजनाद्वारा कामाची दिशा व धोरण निश्चित करण्यात येते. ते करताना उद्भवणाऱ्या
संभाव्य अडचणी व त्यावरील उपाययोजनांचा विचार करण्यात येतो.

**(२) 0 - Organisation (संघटन) :** नियोजन कार्य पूर्णत्वास नेण्यासाठी संघटन आवश्यक असते. त्याअंतर्गत उपलब्ध कर्मचारी वर्ग, त्यांचे अधिकार व कार्ये यांची वाटणी करण्यात येते.
**(३) S - Staffing (कर्मचारी वर्ग) :** संघटनेचे कार्य करण्यासाठी कर्मचारी वर्ग आवश्यक असतो. कर्मचाऱ्यांची भरती,
भरती करणारी यंत्रणा, प्रशिक्षण, सेवाशर्ती इत्यादींची तरतूद करावी लागते.
**(४) D – Directing (मार्गदर्शन)** संघटनेचे कार्य यशस्वीपणे पार पाडण्यासाठी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या कुशल मार्गदर्शकाची आवश्यकता असते. तो कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करतो व त्यांच्या शंकांचे निरसन करतो.
**(५) co- Coordination (समन्वय) :** कामाच्या सोयीसाठी जरी संघटनेची विविध विभागांत विभागणी करण्यात आली असली, तरी त्यांच्यात समन्वय साधणे गरजेचे असते. समन्वयाची ही भूमिका, मार्गदर्शक पार पाडतो.
**(६) R - Reporting (अहवाल) :** प्रत्येक संघटन आपल्याकार्याचा अहवाल वरिष्ठांना सादर करते. त्या अहवालात कामात उद्भवणाऱ्या अडचणी विशद केल्या जातात. वरिष्ठांकडून त्या अडचणींचे निराकरण केले जाते. अहवाल सादरीकरणामुळे संघटनेत जबाबदारी/उत्तरदायित्वाची भावना निर्माण होते. -
**(७) B Budgeting (अंदाजपत्रक) :** संघटनेचे कार्य करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे आवश्यक असते. प्रत्येक कामासाठी किती पैसे खर्च करावे लागतील, याचा अंदाज व्यक्त करण्यात येतो. त्याच्या आधारे प्रशासन अंदाजपत्रक तयार करते आणि आवश्यक तो निधी उपलब्ध करून देते. निधीचा विनियोग योग्य प्रकारे व्हावा या उद्देशाने हिशेबपद्धती निश्चित केली जाते. पैसे खर्च मंजुरीसाठी ज्येष्ठ अधिकाऱ्याचे नियंत्रण जरुरीचे असते.
**(२) व्यापक दृष्टिकोन :** व्यापक दृष्टिकोनात शासनाच्या तिन्ही शाखांचा लोकप्रशासनात समावेश करण्यात येतो कारण राज्याचे सर्व व्यवहार लोकप्रशासनाशी निगडित असतात. मात्र बहुसंख्य अभ्यासक या विचाराशी सहमत नाहीत. त्यांच्या मते, प्रशासकीय बाबीत कार्यकारी मंडळ व सनदी नोकरवर्ग आणि त्यांच्याशी निगडित बाबींचा, म्हणजेच केवळ प्रशासकीय बाबींचा समावेश होत असतो.